**जाबदारातर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. ए. एस. पुजारी यांच्यामार्फत**

**शपथेवर सुरू**

११. मला संगणक चालविता येतो. मला संगणकाचे ज्ञान आहे. हे म्हणणे खरे आहे की सुरूवातीला माझी नेमणुक जिल्हा परिषद, सांगली यांचेकडून संगणकाचे ज्ञान असल्याने संगणक परिचालक म्हणून तात्पुरत्या स्वरूपात करार पध्दतीने झाली होती व त्यांचेकडून मानधन मिळत होते. हे म्हणणे खरे आहे की मी जिल्हा परिषद, सांगली यांचेकरीता सन २०१५ पर्यंत काम केले. तो करार डिसेंबर, २०१५ साली संपला होता. हे म्हणणे खरे आहे की मी जाबदार ग्रामपंचायतीकडे तात्पुरत्या स्वरूपाने कामावर नेमणुकीविषयी विनंती केली होती. हे म्हणणे खरे आहे की ग्रामपंचायतीने मला हंगामी स्वरूपात वसुली लिपीक आणि संगणक चालक म्हणून कामावर घेतले.

१२. हे म्हणणे खरे आहे की माझेवर ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील घ ारपट्टी, नळपट्टी व इतर प्रकारचे कर वसुलीचे काम करण्याची जबाबदारी होती. हे म्हणणे खरे आहे की घरकुल प्रस्ताव योजनेचे अर्ज संबंधित कार्यालयाकडे पाठविणे याचीही जबाबदारी माझेकडे होती. हे म्हणणे खरे नाही की मी वेळेवर काम करीत नव्हतो आणि त्यामुळे माझेकडे ग्रामपंचायतीतील घरपट्टी, नळपट्टटी वसुलीचे काम प्रलंबित राहिले होते तसेच वेळेत घरकुल योजनेचे अर्ज पाठविले नसल्याने त्याचेही काम प्रलंबित राहिले होते. हे म्हणणे खरे नाही की मी वेळोवेळी दिलेल्या सुचनेनुसार काम करीत नव्हतो त्यामुळे माझे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायतीचे सदस्य आणि ग्रामसेवक यांचेशी वाद होत होते. हे म्हणणे खरे नाही की मला ग्रामपंचायतीचे वसुलीचे काम वेळेत करा व वसुली यशस्वीपणे करा असे सांगितले असता मी सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायतीचे सदस्य यांचेशी उध्दटपणे वर्तन करीत होतो.

**प्रश्न :** ग्रामपंचायतीने पारीत केलेला निशाणी यु—४/१ वरील ठराव हा तुम्ही तयार करून दाखल केला आहे?

**उत्तर :** तो ठराव मी संगणकावर संबंधितांच्या सांगण्यानुसार टंकलिखीत केला आहे. परंतु, तो ठराव ग्रामपंचायतीने पारीत केला आहे.

१३. हे म्हणणे खरे नाही की त्या ठरावावर ग्रामपंचायतीचा सही व शिक्का नाही. हे म्हणणे खरे नाही की दि. १६/०३/२०१६ रोजी ग्रामपंचायत, लिंगनूर यांनी निशाणी यु—४/१ प्रमाणे कोणताही ठराव पास केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सदर ठरावाची खोटी व बनावट प्रत तयार करून अभिलेखावर दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की मी निशाणी यु—४/२ ते यु—४/५ ही वैद्यकीय उपचाराबाबतची कागदपत्रे खोटी व बनावट तयार करून दाखल केली आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी तसे कोणतेही उपचार घेतलेले नाहीत आणि त्यामुळेच तशी मुळ उपचाराची कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली नाहीत. साक्षीदार स्वतः सांगतो की मी उपचाराची मुळ कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली आहेत.

१४. मी ऑगस्ट, २०२२ या कालावधीत मी आजारी असल्याने गैरहजर राहणार आहे या आशयाचा लेखी अर्ज ग्रामपंचायतीकडे दिला नव्हता. साक्षीदार स्वतः सांगतो की मी त्याबाबत तोंडी सुचना करून माहिती दिली होती. हे म्हणणे खरे नाही की मी आणि जाबदार यांचेमध्ये कामगार—मालक नाते आहे हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की जाबदार यांनी माझी ग्रामपंचायतीमध्ये कामगार म्हणून कायमस्वरूपी नेमणुक केली होती हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की मी जाबदार यांचेकडे कायमस्वरूपी कामगार म्हणून केव्हाही नेमणुकीस नव्हतो व त्यामुळेच माझेविरूध्द खातेनिहाय चौकशी करण्याची गरज नव्हती.

१५. हे म्हणणे खरे नाही की मी ग्रामपंचायतीकडे तात्पुरत्या स्वरूपात कामावर असल्याने मला वेळोवेळी कामाच्या अनुषंगाने मोबदला मिळाला आहे. हे म्हणणे खरे आहे की मी ग्रामपंचायतीकडे काम केलेल्या कालावधीत माझे कामाचा मोबदला मला मिळाला आहे. हे म्हणणे खरे नाही की मला ग्रामपंचायतीने वेळेवर काम करीत नाही, उध्दट वर्तन करतो, कामचुकारपणा करतो, वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करीत नाही अशी कथने करीत दि. ०५/०६/२०२२ रोजी नोटीस दिली होती आणि वर्तणुकीत ७ दिवसांच्या आत सुधारणा करावयाची तंबी दिली होती.

१६. हे म्हणणे खरे आहे की मला दि. ०५/०८/२०२२ रोजीची कारणे दाखवा नोटीस ग्रामपंचायतीकडून मिळाली होती. मी दि. ०५/०८/२०२२ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसला उत्तर दिले आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की ती नोटीस मला दि. २७/०८/२०२२ रोजी मिळाली. हे म्हणणे खरे नाही की मी दि. ०५/०८/२०२२ ची नोटीस मिळूनही खुलासा उत्तर दिले नाही, त्यामुळे ग्रामपंचायतीने दि. १७/०८/२०२२ रोजीची दुसरी कारणे दाखवा नोटीस दिली. साक्षीदार स्वतःहून सांगतो की मला दि. ०५/०८/२०२२ आणि १७/०८/२०२२ या दोन्ही नोटीसा पोस्टाव्दारे एकाच टपालाने दि. २७/०८/२०२२ रोजी मिळाल्या. हे म्हणणे खरे नाही की मला वेळोवेळी निर्देशित करूनही मी कामावर हजर राहत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की मला ग्रामपंचायतीचे कर्मचारी यांनी स्वतः भेटून ग्रामपंचायतीचा ७५ वा अमृत महोत्सव आहे आणि तुम्ही कामावर हजर व्हा असे सांगूनही मी कामावर हजर राहिलो नाही.

१७. हे म्हणणे खरे नाही की मला सांगूनही मी कामावर हजर राहत नसल्याने दि. १९/१०/२०२२ रोजी मला ग्रामपंचायतीमार्फत कामावरून कमी करण्याची नोटीस देण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की जाबदार ग्रामपंचायत यांचेकडे सन २०१६ पूर्वीपासून कायम कर्मचारी म्हणून शामराव नाईक, तानाजी मगदुम आणि शिवाजी नागणे हे तीन कर्मचारी काम करीत होते. ग्रामपंचायतीने वार्षिक उत्पन्नाच्या २५ टक्के एवढी रक्कम कर्मचा–यांच्या वेतनावर

खर्च करावी असे शासनाचे नियम आहेत, याविषयी मला माहिती नाही. मी अभिलेखावर पगारपत्रक हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी ग्रामपंचायत, लिंगनूर यांचेकडे केव्हाही कायमस्वरूपी कामगार म्हणून काम करीत नव्हतो त्यामुळेच मी माझे पगारपत्रक हजर केलेले नाही.

१८. मला ग्रामपंचायतीव्दारे माझे अर्जातील परिच्छेद क्र. ४.३ मध्ये नमूद केलेप्रमाणे त्रास देण्यात येत होता याबाबत मी वरिष्ठांकडे तक्रार केली आहे. मी मला देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसा या बेकायदेशीर आहेत या अनुषंगाने बी.डी.ओ., जिल्हा परिषद यांचेकडील अध्यक्ष किंवा कार्यकारी अधिकारी यांचेकडे तक्रार दिलेली नाही. साक्षीदार स्वत: सांगतो की त्या नोटीसा मी न्यायालयामध्ये आव्हानीत केल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की मी माझे अर्जातील परिच्छेद क्र. ४.६ मध्ये नमूद केलेल्या कथनांबाबत बी.डी.ओ. व इतर वरिष्ठ अधिका–यांकडे तक्रार केलेली नाही.

१९. हे म्हणणे खरे नाही की मी शेती व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे आहे की माझे वडीलांच्या नावे शेतजमिन आहे. हे म्हणणे खरे नाही की माझी आई आणि पत्नी यांचे नावे शेतजमिन आहे. सन २०२१–२२ मध्ये शेतक–यांचे जे नुकसान झाले त्या अनुषंगाने अहवाल तयार करून शासनास जमा करावयाची जबाबदारी माझेवर होती, याबाबत मला आठवत नाही. माझे वडील आप्पासो कुडचे, आई मालाबाई आप्पासो कुडचे आणि पत्नी सरोजिनी राजू कुडचे यांना शासनामार्फत द्राक्षबाग नुकसानभरपाई मिळाली आहे, याबाबत मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी ग्रामपंचायतीमध्ये काम करीत असताना माझी आई आणि पत्नी यांचे नावे शेतजमिन नसतानाही त्यांचे नावे द्राक्षबाग क्षेत्र दाखवून नुकसानभरपाई रक्कम देण्याची कार्यवाही केली आणि शासनाच्या रकमेचा अपहार केला. हे म्हणणे खरे नाही की त्या अनुषंगाने गावातील रहिवाशांकडून तक्रारी आल्यानंतर मी ग्रामपंचायतीच्या संगणकामधील सर्व डाटा नष्ट केला. हे म्हणणे खरे नाही की मी ग्रामपंचायतीच्या संगणकातील डाटा नष्ट केल्यामुळे ग्रामपंचायतीचे

नुकसान झाले. हे म्हणणे खरे नाही की मला माझे सदर कृत्यामुळे सरपंच व ग्रामसेवक यांनी ग्रामपंचायतीचे नुकसान केल्याची ताकीद दिली.

२०. मला आकृतीबंध व कर्मचारी नेमणुकीबाबतचा कायदा माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की जाबदार ग्रामपंचायत हीचा परिमंडळ—२ मध्ये समावेश होत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी जाबदार ग्रामपंचायतीकडे दि. ०१/०१/२०१६ पासून आकृतीबंधामधील कायम व कुशल कर्मचारी म्हणून काम करीत असल्याने मला वेतनवाढ देण्यात आली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सहा वर्षे कालावधीमध्ये माझी सेवा प्रामाणिकपणे व सचोटीने केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की जाबदार ग्रामपंचायतीची लोकसंख्या ५,०६३ असल्याचे व तिच्यामध्ये ४ कामगारांची नेमणुक करण्याची आवश्यकता असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की जाबदार ग्रामपंचायतीच्या संबंधित लोकांनी मला मानसिक व शारिरीक त्रास दिला हे मी खोटे सांगत आहे.

२१. हे म्हणणे खरे नाही की मी दि. ०७/०८/२२ ते १८/०८/२२ या कालावधीत आजारी असल्याचे व उपचार घेतलेचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की दि. १९/०८/२०२२ पासून मला सरपंचानी कामावर हजर करून घेतले नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी जाबदार ग्रामपंचायतीमध्ये कोणालाही भेटून कामावर हजर करून घेणेविषयी विनंती केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी जाबदार यांचेकडे पुर्ववत कामावर रूजू करण्याची विनंती केली, हजेरीपत्रकाची मागणी केली, मला हजेरीपत्रक दिले नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी जाबदार ग्रामपंचायत यांचेकडे केव्हाही कायमस्वरूपी कामगार म्हणून काम करीत नव्हतो व त्यामुळे केव्हाही हजेरीपत्रकावर सही केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळेच मी प्रस्तुत प्रकरणात हजेरीपत्रक दाखल केलेले नाही.

२२. हे म्हणणे खरे नाही की जाबदाराने मला बाजू मांडणेची संधी दिली नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी जाबदार ग्रामपंचायतीमध्ये सलगपणे २४० दिवसांपेक्षा जास्त दिवस काम केले हे खोटे सांगत आहे. मी माझे स्वतःव्यतिरिक्त इतर कोणत्याही साक्षीदाराचा पुरावा प्रस्तुत प्रकरणात दाखल करणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी जाबदार ग्रामपंचायतीविरूध्द खोटी व चुकीची कथने करीत खोटी तक्रार दाखल केली आहे व जाबदार ग्रामपंचायतीस बाजू मांडणेस भाग पाडले आहे. हे म्हणणे खरे आहे की आजरोजी माझेसोबत तानाजी मगदुम हजर आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी जाबदार यांचेकडून आर्थिक लाभ मिळविण्याच्या उद्देशाने खोटी व चुकीची तक्रार दाखल केली आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती

**सही/—**

स्थळ : सांगली

( सैफुद्दीन बा. शेख )
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, सांगली.

दि. ०९/०७/२०२४